अंगणवाडी सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका यांचे मानधन अदा करण्यासाठी अर्थसंकल्पित केलेला निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१७/प्र.क्र.१९०/का.६

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ फेब्रुवारी, २०१८

वाचा :- १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.१०९/का.६, दिनांक २६ एप्रिल २०१७
२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.१०९/का.६, दिनांक ५ मे २०१७
३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.१०९/का.६, दिनांक १७ जून २०१७

शासन निर्णय-

महिला व बाल विकास विभागामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवायोजन,नवी मुंबई या कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे. अंगणवाडी सेविका/मदतनीस/मिनी अंगणवाडी सेविका यांना देण्यात येणाऱ्या मानधानासाठी सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या निधीपैकी लेखानुदानाचा दोन महिन्यासाठीचा निधी दिनांक २६ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला आहे. राज्य मानधनाच्या हिश्यापोटी अर्थसंकल्पित केलेला निधी दिनांक ५ मे २०१७ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला आहे.

२. एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र व राज्य हिश्याचे निधीचे प्रमाण ६०:४० असे आहे. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याशिवाय अर्थसंकल्पित केलेली Shadow तरतूद खर्च करु नये अशा वित्त विभागाच्या सूचना आहेत. केंद्र शासनाकडून वेळेत निधी प्राप्त होत नसल्यामुळे अंगणवाडी सेविकांचे मानधन वेळेत अदा करणे शक्य होत नाही. यास्तव मानधनाची रक्कम उणे प्राधिकारपत्रावर काढण्यास मान्यता देण्याबाबत वित्त विभागास विनंती करण्यात आली होती. अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २ जून २०१७ रोजी वित्त विभागाने बैठकीचे आयोजन केले होते. सदर बैठकीत सेविकांच्या मानधनाची अर्थसंकल्पित केलेली रक्कम केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला नसला तरी खर्च करण्यास विभागास परवाणगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.याबाबतचे बैठकीचे इतिवृत्त वित्त विभागाने दिनांक १३ जून २०१७ रोजी निर्गमित केले आहे. केंद्र शासनाकडून एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या निधीबाबत ऑगस्ट-२०१७ व जानेवारी-२०१८ अखेर वित्त विभागास माहिती सादर करण्याबाबत विभागास कळविण्यात आलेले आहे. त्यानंतर मानधनासाठी अर्थसंकल्पित केलेला व शिल्लक राहिलेला निधी दिनांक १७ जून २०१७ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला आहे.

३. अंगणवाडी सेविका/मदतनीस/मिनी अंगणवाडी सेविका यांना देण्यात येणा-या मानधानासाठी अर्थसंकल्पित केलेला निधी कमी पडत असल्यामुळे जुलै-२०१७ च्या अधिवेशनात रुपये १६६९७.३५ लाख पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यापैकी खालीलप्रमाणे **रुपये १२७०३.०० लाख** इतका निधी खर्च करण्यासाठी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांना वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

(रुपये लाखात)

लेखाशिर्ष	बाब	अर्थसंकल्पीत निधी	यापूर्वी वितरीत केलेला निधी	जुलै-२०१७ पुरवणी मागणी अर्थसंकल्पित निधी	या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी
२२३६१९०९ (केंद्र)	०२-मजूरी	२७८२६.८६	२७८२६.८६	६८६६.६१	४४७०.००
२२३६१९१८ (राज्य)	०२-मजूरी	१८५५१.२४	१८५५१.२४	४५७७.७४	२९८०.००
२२३६१९४५ (राज्य)	०२-मजूरी	३१२२६.९७	३१२२६.९७	५२५३.००	५२५३.००
एकुण		**७७६०५.०७**	**७७६०५.०७**	**१६६९७.३५**	**१२७०३.००**

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२३१६४४१८३६३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.02.23 16:44:47 +05'30'

(ला.रा.गुजर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई
४) सर्व,जिल्हा कोषागार अधिकारी
५) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
६) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई.
७) सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हा परिषद)
८) वित्त विभाग (व्यय/६ ,अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
९) नियोजन विभाग (का.१४७२),मंत्रालय,मुंबई.
१०) सह सचिव/उप सचिव (श्री. गुजर /श्रीम. निवतकर), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) निवड नस्ती -का-६.